जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१२४८३/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :-१९/१०/२०२४

विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील.

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचे दिनांक २२/१०/२०२४ ते दिनांक ०४/११/२०२४ रोजी पर्यंत खालील ठिकाणी निवडणूक प्रक्रियेचे कामकाज (नामनिर्देशन पत्र दाखल करणे, नामनिर्देशन पत्राची छाननी करणे व नामनिर्देशन पत्र मागे घेणे इ. कामे) विधानसभा मतदार संघ निहाय खालील ठिकाणी चालणार आहे.

| अ.क्र. | विधानसभा मतदार संघाचे नाव | कामकाजाचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | २०८ वडगावशेरी | सहा. आयूक्त येरवडा-कळस-धानोरी झोनल ऑफीस पुणे महानगरपालिका पुणे-४११०१९ |
| २. | २०९ शिवाजीनगर | साने गुरुजी ग्रंथालय, दुसरा मजला, पंडीत जवाहरलाल नेहरु सांस्कृतीक भवन घोले रोड,पुणे-०६ |
| ३. | २१० कोथरुड | कैलासवासी अनुसयाबाई खिलारे शाळा,एरंडवणा, पुणे |
| ४. | २११ खडकवासला | पहिला मजला, एस.के.एन.एस.एस.बी.एम. इमारत सिंहगड कॉलेज कॅम्पस,सेंट्रल लायब्ररी जवळ, आंबेगांव बुद्रुक, ता-हवेली, पुणे-४११०४६ |
| ५. | २१२ पर्वती | दुसरा मजला, कैलासवासी भाऊराव सनस क्रिडांगण, सारसबाग जवळ, पुणे |
| ६. | २१३ हडपसर | पुणे महानगरपालिका विठ्ठल तुपे पाटील ऑडीटोरियम माळवाडी, हडपसर पुणे ४११०२८ |
| ७. | २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट | भारतरत्न श्री विश्वसराय्या हॉल, पीडब्ल्युडी सबडिव्हिजन नं-५ तिसरा मजला अर्सनल प्लॉट, सागर प्लाझा चे समोर, पुणे कॅम्प, पुणे |
| ८. | २१५ कसबा पेठ | गणेश कला क्रिडा रंगमंच, स्वारगेट जवळ, पुणे |

वरील ठिकाणी नामनिर्देशन पत्राचे प्रक्रियेचे कामकाज चालणार आहे. सदरचे कामकाज सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी व पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी वरील नमूद कार्यालयाचे २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

*त्याअर्थी मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा* संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, वर नमुद *तक्त्यामधील नामनिर्देशन पत्र प्रक्रिया चालणारे कार्यालयांच्या २०० मीटर परिक्षेत्रात दिनांक* २२/१०/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०४/११/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१. उमेदवारी नामनिर्देशन पत्र दाखल करताना वरील ठिकाणी उमेदवारासोबत ०४ पदाधिकारी किंवा सुचक / कार्यकर्ते यांच्या व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीस आत जाण्यास मनाई करण्यात येत आहे.
२. वरील ठिकाणी कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास व कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे.
३. वरील ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.
४. वरील ठिकाणी कोणताही मजकूर लिहण्यास अगर छापील मजकूर चिटकविण्यास मनाई करण्यात येत आहे.
५. वरील ठिकाणी नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मिटरचे आत ३ वाहने घेऊन जाण्यास परवानगी आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१९ /१०/२०२४ रोजी दिला आहे.

Jt. Commissioner of Police ★ Pune City ★

19/10/24

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१९/१०/२०२४

प्रत सादर :-

१.मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२.मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३.मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४.मा.पोलीस आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, पुणे शहर